नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ९ Issue - 9 | वार - बुधवार दि. ३ जून २०२६ Blow- Wednesday Date 3 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# शेतकरी कर्जमुक्ती योजनेला मंत्रिमंडळाची मंजुरी

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना; दोन लाखांपर्यंतचे कर्जमाफ, 'वन टाईम सेटलमेंट' आणि प्रोत्साहनपर अनुदान देणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील शेतकरी बांधवांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळवून देणार्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेला मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या योजनेत जमीन धारणेचा निकष नसेल. दोन लाख रुपयांपर्यंत ही कर्जमाफी असेल. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल मंत्रिमंडळ बैठकीत सर्व मंत्र्यांनी टाळ्यांच्या गजरात मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले व या निर्णयाचे स्वागत केले.

या योजनेत कर्जमुक्ती, 'वन टाईम सेटलमेंट' व प्रोत्साहनपर लाभ असे तीन घटक केल्याने, राज्यातील बहुतांश शेतकरी बांधवांना याचा लाभ होणार आहे. ज्यांचे कर्ज दोन लाखांपेक्षा कमी आहे, त्यांना दोन लाख रुपयांपर्यंत माफी मिळाल्याने असे शेतकरी पूर्णपणे कर्जमुक्त होणार आहेत. ज्यांचे कर्ज दोन लाखांपेक्षा अधिक आहे, त्या शेतकर्यांना दोन लाखांवरील थकबाकी ३१ मार्च २०२७ पूर्वी भरल्यास मुदत देण्यात येईल. त्यांच्या खात्यातही दोन लाख रुपये शासन जमा करणार आहे. तर याशिवाय प्रोत्साहनपर लाभ योजनेत कर्जाची नियमित परतफेड करणार्या शेतकर्यांना अधिकाधिक पन्नास हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान मिळणार आहे. या योजनेत राजकीय पदाधिकारी, सरकारी कर्मचारी व आयकर पात्र व्यक्ती, सहकारी संस्थांचे २५ हजार रुपयांहून अधिक वेतन असणारे अधिकारी, कर्मचारी पात्र नसतील.

शेतकर्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली व ३१ मार्च २०२६ अखेर परतफेड न झालेली एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्जखात्यावरील एकत्रित थकबाकीची मुद्दल व व्याजासह अधिकतम दोन लाखापर्यंत आहे, अशा शेतकर्यांना (जमीन धारणेचे क्षेत्र विचारात न घेता) दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी दिली जाईल.

या योजनेमध्ये १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्ज खात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली व ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल, अशा शेतकर्याने दोन लाखांपेक्षा जास्त असलेली थकीत रकमेची बँकेस/संस्थेस परतफेड करणे आवश्यक असेल. अशी रक्कम परतफेड केल्यानंतर पात्र शेतकर्याला 'वन टाईम सेटलमेंट' म्हणून दोन लाख रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ देण्यात येईल.या योजनेत देखील १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ अखेर उचल केलेल्या पीक कर्जाचे पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या कर्जखात्यांपैकी एक किंवा अनेक बँकांकडील ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या व ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या थकीत हप्त्यांची मुद्दल व व्याजासह दोन लाखांपेक्षा



जास्त असल्यास अशा शेतकर्याने प्रथम दोन लाखांपेक्षा जास्त असलेली थकीत हप्त्यांच्या रकमेची परतफेड करणे आवश्यक असेल. अशी रक्कम परतफेड केल्यानंतरच पात्र शेतकर्याला एकवेळ समझोता योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांची कर्जमाफी मिळेल. तसेच, या योजनेमध्ये शेतकर्यांना त्यांच्या हिश्श्याची दोन लाखांवरील रक्कम बँकेमध्ये जमा करण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

प्रोत्साहनपर लाभ योजना

ज्या शेतकर्यांची मुद्दल व व्याजासह थकबाकीची रक्कम ५० हजार रुपयांपेक्षा जास्त आहे, अशा शेतकर्यांनी पन्नास हजार रुपयांवरील संपूर्ण थकबाकी बँकेत जमा केल्यानंतर त्यांना प्रतिशेतकरी पन्नास हजार रुपये देण्यात येणार आहेत, जेणेकरून ते कर्जमुक्त होतील. या योजनेमध्ये शेतकर्यांना त्यांच्या हिश्श्याची ५० हजारांवरील रक्कम बँकेमध्ये जमा करण्यासाठी देखील ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती (२०१९) योजनेमध्ये ज्या शेतकर्यांना लाभ मिळाला आहे. अशा शेतकर्यांनी नव्याने घेतलेल्या कर्जाची थकबाकी झाली असल्यास अशा शेतकर्यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेल्या व ३१ मार्च २०२६ अखेर परतफेड न झालेली मुद्दल व व्याजासह रक्कम ५० हजार रुपये असल्यास अशा शेतकर्यांना ५० हजार रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. नियमित परतफेड करणार्या शेतकर्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी सन २०२२-२३, सन २०२३-२४, सन २०२४-२५ तीन आर्थिक वर्षांपैकी, कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन आर्थिक वर्ष संपल्यानंतर ३० जूनपूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार वेळेत कर्जाची परतफेड केलेल्या शेतकर्यांना प्रति शेतकरी ५० हजार रुपये देण्यात येणार आहेत. तथापि, अशा पात्र शेतकर्यांनी चालू आर्थिक वर्षात अल्प मुदत पीक कर्ज घेतले असल्यास अशा कर्जाची देखील मुदतीत परतफेड करणे अनिवार्य असेल.

बँकासोबत वाटाघाटीसाठी सचिवस्तरीय समिती

योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती काम करेल. तसेच राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका व ग्रामीण बँकांकडील शेतकर्यांच्या पीक कर्ज/पुनर्गठित अनुत्पादित कर्जांना कर्जमुक्तीचा लाभ देत असताना अनुत्पादित कर्जाच्या तारखेनुसार कर्ज खतावणी शिल्लकेला निश्चित केलेल्या टक्केवारीप्रमाणे सूट देण्याची रक्कम निश्चित केली जाईल. यासाठी बँकासोबत वाटाघाटी करुन सूट देण्याची रक्कमेचे प्रमाण निश्चित करण्यासाठी अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली, प्रधान सचिव (सहकार), व्यवस्थापकीय संचालक (महा-आयटी), प्रशासक महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, समन्वयक, राज्यस्तरीय बँकर्स समिती व सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांची समिती काम करेल.

कोणकोणत्या बँकांना लागू होईल?

ही योजना राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून घेतलेल्या कर्जास तसेच प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांनी त्यांच्या स्वत:च्या निधीतून वितरित केलेल्या कर्जांना देखील लागू राहील. यासाठी शेतकर्यांचे आधार प्रमाणीकरण केले जाईल. तसेच, ॲग्रीस्टॅक आधार सामग्री मंचावर शेतकर्यांची नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. योजनेच्या कार्यान्वयनासाठी अद्ययावत पोर्टल विकसित करण्यात येईल.

# हवामानात मोठे बदल, राज्यात येत्या ४८ तासात जोर'धार' कोसळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मान्सून संदर्भात एक महत्वाची अपडेट समोर आली आहे. केरळमध्ये ४ जूनच्या आसपास नैऋत्य मान्सून दाखल होण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाकडून वर्तविण्यात आली आहे. मान्सूनच्या पुढील प्रगतीसाठी वातावरण अनुकूल असून लक्षद्वीप, केरळ आणि तामिळनाडूच्या आणखी काही भागांत मान्सूनची आगेकूच अपेक्षित आहे, असे देखील हवामान विभागाकडून सांगण्यात आलं आहे.

दरम्यान, अरबी समुद्राच्या नैऋत्य व आग्नेय भागात मान्सूनचा प्रवास होणार आहे. तर बंगालच्या उपसागरातील पश्चिम-मध्य, पूर्व-मध्य आणि ईशान्य भागांतही मान्सून पुढे सरकणार असल्याचे सांगण्यात आलं आहे. आग्नेय बंगालच्या उपसागरातील उर्वरित भागांमध्येही ४ जूनच्या आसपास मान्सून पोहोचण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे लवकरच उकाड्या पासून हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.



दरम्यान, ४ जूनच्या सुमारास नैऋत्य मान्सूनची पुढील वाटचाल होण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. या वाटचालीमुळे मान्सून नैऋत्य आणि आग्नेय अरबी समुद्राच्या काही आणखी भागांमध्ये, लक्षद्वीप बेटांवर, केरळ आणि तामिळनाडूच्या काही भागांमध्ये, तसेच नैऋत्य, पश्चिम-मध्य, पूर्व-मध्य आणि ईशान्य बंगालच्या उपसागराच्या काही आणखी भागांमध्ये आणि आग्नेय बंगालच्या उपसागराच्या उर्वरित भागांमध्ये विस्तारण्याची शक्यता आहे, असे खचऊने मंगळवारी स्पष्ट केले.

आयएमडीने दिलेल्या माहितीनुसार, पुढील सहा ते सात दिवसांत केरळमध्ये काही ठिकाणी (विखुरलेल्या स्वरूपात) जोरदार ते अतिजोरदार पाऊस (७ ते २० सेमी) पडण्याची दाट शक्यता आहे. याच कालावधीत तामिळनाडू आणि कर्नाटकच्या काही भागांतही काही ठिकाणी जोरदार पाऊस अपेक्षित आहे. या आठवड्यादरम्यान, उत्तर-पश्चिम, मध्य, पूर्व भारत आणि दक्षिण द्वीपकल्पीय भारताच्या काही भागांत मध्यम ते तीव्र स्वरूपाच्या मेघगर्जनेसह वादळी वाऱ्यांचे (ज्यांचा वेग ४० ते ५० किमी प्रति तास असू शकतो) वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. आयएमडीच्या 'विस्तारित श्रेणी अंदाजा'नुसार २८ मे ते ४ जून या कालावधीत केरळमध्ये हवामान प्रामुख्याने कोरडे राहण्याची शक्यता आहे. ४ जून ते ११ जून या काळात हवामानात अत्यंत किरकोळ सुधारणा होण्याची अपेक्षा वर्तवण्यात आली आहे. पश्चिम पॅसिफिक महासागरावर विकसित होत असलेले एक 'टायफून' (वादळ)-जे अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील बाष्प मोठ्या प्रमाणात स्वतःकडे खेचून घेत असल्याचे दिसून येत आहे-आणि लक्षद्वीप क्षेत्रावर निर्माण झालेली चक्रीय वाऱ्यांची स्थिती हेच घटक केरळमध्ये मान्सूनचे आगमन उशिरा होण्यास किंवा मान्सूनची सुरुवात कमकुवत होण्यास कारणीभूत ठरण्याची शक्यता आहे.

गेल्या आठवड्यात, भारतीय हवामान विभागाने आपल्या हंगामी पर्जन्यमानाचा अंदाज खालील दिशेने सुधारित केला.

एप्रिलमध्ये जाहीर केलेल्या 'दीर्घकालीन सरासरी'च्या ९२ टक्क्यांवरून तो ९० टक्क्यांवर आणला आणि पावसाळा 'तूट असलेला' असण्याची शक्यता ६० टक्के असल्याचे नमूद केले. याचा अर्थ असा की, एकूण पर्जन्यमान 'सामान्यपेक्षा कमी' मानले जाण्यासाठी आवश्यक असलेल्या किमान मर्यादेपेक्षाही खाली जाण्याची शक्यता ५० टक्क्यांहून अधिक आहे.

# जगातील सर्वात मोठी कृषी बाजारपेठ महाराष्ट्रात उभारणार, निर्यात व्यवस्था बळकट करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून काम करण्याचे राज्य सरकारचे धोरण असल्याचे मत राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केले. शेतीमालाला अधिक भाव मिळावा यासाठी पीक काढणीनंतरची संपूर्ण साखळी मजबूत केली जाणार आहे. कोल्ड स्टोरेज, गोदामे, कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि निर्यात व्यवस्था बळकट करण्यावर भर देण्यात येणार आहे. राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारपेठा विकसित करण्याचा सरकारचा मानस असल्याचे रावल म्हणाले. भविष्यात सुमारे ११०० ते १२०० एकर क्षेत्रावर जगातील सर्वात मोठी कृषी बाजारपेठ महाराष्ट्रात उभारण्याचा संकल्प असल्याचे ते म्हणाले.

या बाजारपेठेद्वारे महाराष्ट्रातील शेतीमाल जागतिक बाजारपेठेत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे रावल म्हणाले. एअरपोर्ट, सीपोर्ट, कंटेनर पोर्ट, रेल्वे आणि महामार्गाशी जोडलेली आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजारपेठ उभारण्याची संकल्पना आहे. देशातील प्रभावी बाजार समित्यांचे आधुनिकीकरण आणि उन्नतीकरण करण्यात येणार आहे. अनुभवी अधिकारी, माजी संचालक, माजी अध्यक्ष आणि क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सल्ल्याने कामकाज केले जाणार आहे. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीची निवड शेतकऱ्यांची पिळवणूक आणि कथित भ्रष्टाचाराच्या पार्श्वभूमीवर करण्यात आल्याचे ते म्हणाले. महाराष्ट्र फलोत्पादन, शेतीमाल उत्पादन आणि कृषी विपणनाच्या दृष्टीने महत्त्वाचे राज्य आहे. राज्यात समुद्रमार्गे मध्य-पूर्व आशियायी देशात मोठ्या प्रमाणात भाजीपाला, फळे व इतर शेतीमाल निर्यात होते. ही निर्यातीची संधी आणखी वाढवण्यासाठी राज्यातील कृषी पणन व्यवस्था जागतिक पणन व्यवस्थेच्या दृष्टीने सक्षम आणि अत्याधुनिक होणे आवश्यक आहे. 'डिजिटल मार्केटिंग'च्या दृष्टीने राज्यातील संपूर्ण कृषी पणन व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, अशा सूचना पणनमंत्री जयकुमार रावल यांनी बैठकीत दिल्या होत्या.

**परिवहनमंत्र्यांनी जाहीर केली मदत** | **मृतांच्या वारसांना प्रत्येकी ₹१० लाखांची मदत देण्यात येणार**

# सुरतमध्ये दोन 'एसटी' बसचा अपघात; ८ प्रवाशांचा होरपळून मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सुरत : गुजरातच्या सुरत जिल्ह्यातील बारडोली जवळून जाणाऱ्या धुळे हायवेवर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या दोन एसटी बसचा अत्यंत थरकाप उडवणारा भीषण अपघात झाला आहे. दोन बसमध्ये झालेली समोरासमोर धडक इतकी भयानक होती की, धडकेनंतर एक एसटी बस थेट महामार्गावर उलटली आणि क्षणार्धात तिने पेट घेतला. या आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने आठ प्रवाशांचा जागीच होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला तर १५ जण जखमी झाले. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.हा अपघात बारडोली तालुक्यातील उवा आणि मानेकपोर गावाच्या दरम्यान मंगळवारी सायंकाळी ५ ते सव्वा पाच वाजेच्या सुमारास घडला. अपघातात बळी पडलेल्या महाराष्ट्र परिवहन मंडळाच्या दोन्ही एसटी बसचे क्रमांक एमएच १८ बीझेड १२५८ आणि एमएच २० बीएल ३३९० असे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, यातील एक बस (धुळे-सुरत) धुळ्याहून नंदूरबार-नवापूर मार्गे सुरतच्या दिशेने येत होती, तर दुसरी बस गुजरातहून महाराष्ट्राच्या दिशेने जात होती. चालकाचे नियंत्रण सुटल्याने एक बस आधी हायवेवरील डिव्हायडरला जाऊन धडकली. याच वेळी समोरून येणारी दुसरी बस तिला वाचवण्याच्या प्रयत्नात बाजूला जात असताना थेट महामार्गावर उलटली.



बस उलटताच एका मोठ्या स्फोटाने आगीचा गोळा बनली. आग इतकी वेगाने पसरली की आतील प्रवाशांना बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही. या अपघातात दुसऱ्या बसच्या पुढच्या भागाचाही पूर्णपणे चेंदामेंदा झाला आहे.भयानक अपघाताची माहिती मिळताच बारडोली अग्निशमन दलाचे जवान, स्थानिक पोलीस आणि रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी पोहोचल्या. बसला लागलेली आग भीषण असल्याने सुरुवातीला आत अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यात मोठ्या अडचणी येत होत्या. अग्निशामक दलाच्या जवानांनी अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने तात्काळ बचावकार्य सुरू करत जखमींना बसबाहेर काढले.

दुर्घटनेत होरपळलेल्या प्रवाशांपैकी आठ जणांचा मृत्यू झाला आहे. पोलिसांनी घटनास्थळावरून मृतदेह ताब्यात घेऊन ते तातडीने बारडोली येथील सरकारी रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. अपघातात अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.अपघातामुळे धुळे-सुरत हायवेवर दोन्ही बाजूंनी अनेक किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. पोलीस प्रशासन सध्या क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला करून हायवेवरील वाहतूक पूर्ववत करण्याचे प्रयत्न करत आहे.

परिवहनमंत्र्यांनी जाहीर केली मदत

सुरत-धुळे आणि जामनेर-सुरत या एसटी बसेसना गुजरातमधील व्यारा येथे झालेल्या भीषण अपघाताची बातमी अत्यंत दुःखद आणि वेदनादायी आहे. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या प्रवाशांना तसेच एसटी कर्मचाऱ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी असून, या कठीण प्रसंगी संपूर्ण एसटी परिवार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. मृतांच्या वारसांना प्रत्येकी ₹१० लाखांची मदत देण्यात येणार असून, जखमी प्रवाशांवर मोफत आणि सर्वोत्तम वैद्यकीय उपचार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जखमींनी लवकरात लवकर पूर्णपणे बरे व्हावे, हीच ईश्वरचरणी प्रार्थना; असे राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक म्हणाले. त्यांनी अपघाताची माहिती मिळताच दुःख व्यक्त केले आणि प्रशासनाला मदत करण्यासाठी आवश्यक ते निर्देश दिले.

## संपादकीय....

### योजनेतून कर्जमुक्ती

राज्यातील शेतकरी बांधवांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळवून देणार्‍या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेला मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या योजनेत जमीन धारणेचा निकष नसेल. दोन लाख रुपयांपर्यंत ही कर्जमाफी असेल. या योजनेत कर्जमुक्ती, 'वन टाईम सेटलमेंट' व प्रोत्साहनपर लाभ असे तीन घटक केल्याने, राज्यातील बहुतांश शेतकरी बांधवांना याचा लाभ होणार आहे. ज्यांचे कर्ज दोन लाखांपेक्षा कमी आहे, त्यांना दोन लाख रुपयांपर्यंत माफी मिळाल्याने असे शेतकरी पूर्णपणे कर्जमुक्त होणार आहेत. ज्यांचे कर्ज दोन लाखांपेक्षा अधिक आहे, त्या शेतकर्‍यांना दोन लाखांवरील थकबाकी ३१ मार्च २०२७ पूर्वी भरल्यास मुदत देण्यात येईल. त्यांच्या खात्यातही दोन लाख रुपये शासन जमा करणार आहे. तर याशिवाय प्रोत्साहनपर लाभ योजनेत कर्जाची नियमित परतफेड करणार्‍या शेतकर्‍यांना अधिकाधिक पन्नास हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान मिळणार आहे. या योजनेत राजकीय पदाधिकारी, सरकारी कर्मचारी व आयकर पात्र व्यक्ती, सहकारी संस्थांचे २५ हजार रुपयांहून अधिक वेतन असणारे अधिकारी, कर्मचारी पात्र नसतील. शेतकर्‍यांनी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली व ३१ मार्च २०२६ अखेर परतफेड न झालेली एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्जखात्यावरील एकत्रित थकबाकीची मुद्दल व व्याजासह अधिकतम दोन लाखापर्यंत आहे, अशा शेतकर्‍यांना (जमीन धारणेचे क्षेत्र विचारात न घेता) दोन लाख रुपयांपर्यतची कर्जमाफी दिली जाईल. या योजनेमध्ये १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्ज खात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली व ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल, अशा शेतकर्‍याने दोन लाखांपेक्षा जास्त असलेली थकीत रकमेची बँकेस/संस्थेस परतफेड करणे आवश्यक असेल. अशी रक्कम परतफेड केल्यानंतर पात्र शेतकर्‍याला 'वन टाईम सेटलमेंट' म्हणून दोन लाख रुपयांच्या कर्जमाफीचा लाभ देण्यात येईल.

# मतपत्रिकेकडे पुनरागमन की ईव्हीएमवर विश्वास? : लोकशाहीच्या विश्वासार्हतेचा निर्णायक प्रश्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारताच्या निवडणूक प्रक्रियेत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (ईव्हीएम) आणि मतदार पडताळणी यंत्रणा (व्हीव्हीपॅट) यांचा वापर गेल्या दोन दशकांपासून मोठ्या प्रमाणावर होत आहे. निवडणूक आयोगाच्या मते ही प्रणाली जलद, अचूक आणि पारदर्शक आहे. मात्र प्रत्येक निवडणुकीनंतर ईव्हीएमच्या विश्वासार्हतेबाबत प्रश्न उपस्थित होताना दिसतात. अलीकडेच पंजाबमध्ये पुन्हा एकदा मतपत्रिकेवर मतदान घेण्याची मागणी काही राजकीय पक्ष आणि सामाजिक गटांकडून करण्यात आली. त्याच अनुषंगाने उत्तर प्रदेशातील २०२७ च्या विधानसभा निवडणुका मतपत्रिकेवर घ्याव्यात का, हा प्रश्न आता सार्वजनिक चर्चेचा विषय बनला आहे. या प्रश्नाकडे केवळ राजकीय चष्म्यातून पाहणे योग्य ठरणार नाही. कारण हा मुद्दा थेट लोकशाहीच्या विश्वासार्हतेशी आणि मतदारांच्या मनातील निवडणूक प्रक्रियेबद्दलच्या विश्वासाशी संबंधित आहे.

भारतासारख्या विशाल लोकशाही राष्ट्रात निवडणुका म्हणजे जगातील सर्वात मोठा लोकशाही उत्सव. लाखो कर्मचारी, हजारो उमेदवार आणि कोट्यवधी मतदार या प्रक्रियेत सहभागी होतात. अशा परिस्थितीत मतपत्रिकेऐवजी ईव्हीएमचा वापर सुरू करण्यामागे अनेक व्यावहारिक कारणे होती. मतमोजणीतील विलंब, मोठ्या प्रमाणावर होणारे अवैध मतदान, मतपत्रिका लुटणे, बनावट मतदान आणि मतमोजणीतील मानवी चुका या समस्यांवर उपाय म्हणून ईव्हीएमचा स्वीकार करण्यात आला. खरे तर ईव्हीएममुळे निवडणूक निकाल काही तासांत जाहीर होऊ लागले. खर्चात बचत झाली. मतपत्रिकांच्या छपाईवर होणारा कोट्यवधी रुपयांचा खर्च वाचला. मतदान केंद्रांवरील व्यवस्थापन सुलभ झाले. त्यामुळे निवडणूक आयोग ईव्हीएम प्रणालीचे सातत्याने समर्थन करत आला आहे.

परंतु दुसरी बाजूही दुर्लक्षित करता येणार नाही. अनेक राजकीय पक्ष, निवृत्त प्रशासकीय अधिकारी, तंत्रज्ञान क्षेत्रातील काही तज्ज्ञ आणि नागरिक संघटना ईव्हीएमबाबत शंका व्यक्त करत आहेत. त्यांचा मुख्य युक्तिवाद असा आहे की कोणतीही इलेक्ट्रॉनिक प्रणाली शंभर टक्के त्रुटीमुक्त असू शकत नाही. यंत्रामध्ये फेरफार झाला नाही याची खात्री जनतेला कशी मिळणार? निवडणुकीतील पराभवानंतर अनेक पक्षांनी ईव्हीएमवर आरोप केले आहेत. विशेष म्हणजे सत्ताधारी आणि विरोधक या दोन्ही बाजूंनी वेगवेगळ्या काळात अशा शंका व्यक्त केल्या आहेत. याच ठिकाणी प्रश्न फक्त ईव्हीएमचा राहत नाही तर तो लोकशाहीतील विश्वासाचा बनतो. एखादी निवडणूक निष्पक्ष झाली असली तरी जनतेच्या मनात संशय निर्माण झाला तर लोकशाही कमकुवत होते. निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास हा निकालापेक्षा अधिक महत्त्वाचा असतो.

मतपत्रिकेच्या समर्थनार्थ बोलणार्‍यांचे म्हणणे आहे की कागदी मतपत्रिका हा सर्वसामान्य नागरिकाला सहज समजणारा आणि पडताळता येणारा पर्याय आहे. मतदाराने दिलेले मत प्रत्यक्ष कागदावर नोंदवले जाते. आवश्यक असल्यास पुन्हा मोजणी करता येते. त्यामुळे पारदर्शकता वाढते. जगातील अनेक विकसित देश आजही कागदी मतपत्रिकांचा वापर करतात, हेही या गटाचे प्रमुख म्हणणे आहे. मात्र मतपत्रिका प्रणालीही निर्दोष नव्हती. भारताने अनेक दशकांपर्यंत मतपत्रिकेवर निवडणुका घेतल्या आणि त्या काळात बूथ कॅप्चरिंग, मतपेट्या पळविणे, खोट्या मतांची भर घालणे आणि मतमोजणीतील वाद यासारख्या गंभीर समस्या वारंवार समोर आल्या. अनेक ठिकाणी निवडणूक निकालांसाठी अनेक दिवस प्रतीक्षा करावी लागत असे. त्यामुळे फक्त मतपत्रिका आली म्हणजे सर्व प्रश्न सुटतील, असेही म्हणता येणार नाही.



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

यापेक्षा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मतदारांच्या शंका दूर करण्यासाठी कोणती उपाययोजना करता येईल? लोकशाहीत जनतेचा विश्वास सर्वोच्च असतो. जर मोठा वर्ग ईव्हीएमबद्दल प्रश्न विचारत असेल तर त्यांना तुमच्या शंका चुकीच्या आहेत असे म्हणून गप्प बसवणे योग्य नाही. उलट अधिक पारदर्शकता, अधिक पडताळणी आणि अधिक सार्वजनिक सहभाग यावर भर दिला पाहिजे. आज व्हीव्हीपॅट प्रणाली अस्तित्वात आहे. मतदाराने दिलेले मत काही सेकंदांसाठी स्क्रीनवर दिसते आणि त्याची कागदी नोंदही तयार होते. परंतु प्रत्यक्षात सर्व व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांची मोजणी केली जात नाही. त्यामुळे अनेकांचे समाधान होत नाही. जर निवडणूक आयोगाने व्हीव्हीपॅट पडताळणीचे प्रमाण वाढवले किंवा विशिष्ट परिस्थितीत सर्व मतांची कागदी पडताळणी करण्याची यंत्रणा विकसित केली, तर अनेक शंका दूर होऊ शकतात.

उत्तर प्रदेशासारख्या विशाल राज्यात २०२७ मध्ये मतपत्रिकेवर निवडणूक घेणे हा केवळ तांत्रिक प्रश्न नाही तर तो आर्थिक, प्रशासकीय आणि सुरक्षा व्यवस्थेशी संबंधित आहे. कोट्यवधी मतपत्रिका छापणे, त्यांचे वितरण, सुरक्षित साठवणूक, मतमोजणी आणि निकाल प्रक्रिया यासाठी प्रचंड मनुष्यबळ व खर्च लागेल. त्यामुळे मतपत्रिकेच्या बाजूने बोलणार्‍यांनी या व्यावहारिक बाबींचाही विचार करणे आवश्यक आहे. दुसरीकडे ईव्हीएम समर्थकांनीही जनतेच्या प्रश्नांना अहंकारी पद्धतीने नाकारण्याऐवजी त्यांची उत्तरे देण्याची तयारी दाखवली पाहिजे. लोकशाहीत प्रश्न विचारणे हा नागरिकांचा अधिकार आहे. निवडणूक आयोग, तंत्रज्ञ आणि राजकीय पक्ष यांनी एकत्र येऊन अधिक विश्वासार्ह आणि सर्वमान्य प्रणाली निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आज गरज आहे ती ईव्हीएम विरुद्ध मतपत्रिका या संघर्षाची नाही, तर निष्पक्ष आणि सर्वमान्य निवडणूक प्रक्रियेची. कोणतीही प्रणाली अंतिम सत्य नसते. काळानुसार सुधारणा कराव्या लागतात. जर जनतेचा विश्वास वाढवण्यासाठी मतपत्रिका, व्हीव्हीपॅट किंवा अन्य कोणती तांत्रिक सुधारणा आवश्यक असेल, तर त्यावर खुली चर्चा होणे आवश्यक आहे.

लोकशाही केवळ मतदानाने जिवंत राहत नाही तर ती विश्वासाने जिवंत राहते. मतदाराला आपल्या मताचा सन्मान होत असल्याची खात्री वाटली पाहिजे. निवडणुकीचा निकाल कोणाच्या बाजूने लागतो हा दुय्यम मुद्दा आहे, परंतु निकाल कसा लागला याबद्दल सर्वांना समाधान असणे हा प्राथमिक मुद्दा आहे. २०२७ मध्ये उत्तर प्रदेशात मतपत्रिकेवर मतदान व्हावे की ईव्हीएमवर, याचा अंतिम निर्णय निवडणूक आयोग आणि कायदे करणार्‍या संस्थांना घ्यायचा आहे. मात्र या चर्चेने एक गोष्ट स्पष्ट केली आहे की, भारतीय मतदार आता अधिक सजग झाला आहे. तो फक्त मतदान करत नाही, तर मतदान प्रक्रियेबाबतही प्रश्न विचारत आहे. आणि प्रश्न विचारणारा नागरिक हीच सशक्त लोकशाहीची खरी ओळख आहे.

# सायकल : शाश्वत भविष्याचा जीवनमार्ग



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दरवर्षी ३ जून हा दिवस जगभरात 'जागतिक सायकल दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र महासभेने २०१८ मध्ये या दिवसाला अधिकृत मान्यता देऊन सायकलच्या सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि आरोग्यविषयक महत्त्वाला जागतिक स्तरावर अधोरेखित केले. मानवाच्या इतिहासातील सर्वात साध्या, स्वस्त, विश्वासार्ह आणि उपयुक्त शोधांपैकी एक म्हणून सायकलकडे पाहिले जाते. दोन चाकांवर चालणारे हे साधे वाहन केवळ प्रवासाचे साधन नसून आरोग्यदायी जीवनशैली, पर्यावरण संरक्षण, सामाजिक समता आणि शाश्वत विकास यांचे प्रतीक बनले आहे. आजच्या आधुनिक युगात मोटारगाड्या, दुचाकी, रेल्वे, विमान यांसारख्या जलद वाहतूक साधनांची उपलब्धता वाढली असली तरी सायकलचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही. उलट वाढते प्रदूषण, वाहतुकीची समस्या, इंधन संकट, हवामान बदल आणि आरोग्यविषयक आव्हाने यामुळे सायकलचे महत्त्व पूर्वीपेक्षा अधिक वाढले आहे. त्यामुळे जागतिक सायकल दिन हा केवळ एका वाहनाचा गौरव करणारा दिवस नसून मानव आणि निसर्ग यांच्यातील संतुलित नात्याची जाणीव करून देणारा दिवस आहे.

सायकलचा इतिहास पाहिला तर तो अत्यंत रंजक आणि प्रेरणादायी आहे. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला सायकलच्या विविध स्वरूपांचा विकास सुरू झाला. १८१७ मध्ये जर्मनीतील संशोधक कार्ल व्हॉन ड्राइस यांनी 'ड्रेझीन' नावाचे दोन चाकांचे वाहन विकसित केले. त्यानंतर अनेक संशोधकांनी त्यात सुधारणा केल्या आणि आधुनिक सायकलचा जन्म झाला. पेडल, चेन, ब्रेक आणि रबरी टायर यांचा समावेश झाल्यानंतर सायकल अधिक सुरक्षित आणि उपयुक्त बनली. औद्योगिक क्रांतीनंतर सायकलचा प्रसार झपाट्याने वाढला. ती सामान्य माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली. विशेषतः कामगार, विद्यार्थी, शेतकरी आणि मध्यमवर्गीय लोकांसाठी सायकल हे स्वस्त आणि विश्वासार्ह वाहतूक साधन ठरले. भारतातही ब्रिटिश काळात सायकलचा प्रसार झाला आणि हळूहळू ती ग्रामीण व शहरी जीवनाचा महत्त्वाचा भाग बनली.

सायकलचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे तिची साधी रचना आणि सहज उपलब्धता. पेट्रोल, डिझेल, वीज किंवा इतर कोणत्याही इंधनाची गरज नसलेले हे वाहन मानवी शक्तीवर चालते. त्यामुळे ती आर्थिकदृष्ट्या अत्यंत किफायतशीर आहे. वाढत्या महागाईच्या काळात वाहतुकीसाठी होणारा खर्च कमी करण्यासाठी सायकल हा सर्वोत्तम पर्याय ठरतो. गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी सायकल आजही उपयुक्त वाहतूक साधन आहे. विशेषतः ग्रामीण भागात शाळा, बाजारपेठ, शेत आणि विविध कामांसाठी जाण्यासाठी लाखो लोक सायकलचा वापर करतात. अनेक विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या प्रवासात सायकल ही महत्त्वाची साथीदार ठरते. त्यामुळे सायकल ही सामाजिक आणि आर्थिक समतेचे प्रतीक मानली जाते.

आरोग्याच्या दृष्टीने सायकलचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आधुनिक जीवनशैलीमुळे शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत. कार्यालयीन कामे, संगणकाचा वाढता वापर, मोबाईल आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे लोक अधिक वेळ बसून राहू लागले आहेत. परिणामी लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि मानसिक तणाव यांसारख्या समस्या वाढत आहेत. अशा परिस्थितीत सायकल चालविणे हा अत्यंत प्रभावी आणि सोपा व्यायाम आहे. सायकल चालविताना शरीरातील जवळपास सर्व स्नायू सक्रिय होतात. हृदयाची कार्यक्षमता वाढते, रक्ताभिसरण सुधारते, फुफ्फुसांची क्षमता वाढते आणि शरीरातील अतिरिक्त चरबी कमी होते. नियमित सायकलिंगमुळे शरीर तंदुरुस्त राहते तसेच अनेक गंभीर आजारांचा धोका कमी होतो.

मानसिक आरोग्य सुधारण्यातही सायकल महत्त्वाची भूमिका बजावते. वेगवान आणि तणावपूर्ण जीवनशैलीमुळे मानसिक ताणतणाव, चिंता आणि नैराश्य यांचे प्रमाण वाढत आहे. सायकल चालविताना व्यक्ती निसर्गाच्या सान्निध्यात येते, मोकळ्या हवेत वेळ घालवते आणि मनाला आनंद देणारा अनुभव मिळवते. यामुळे मानसिक तणाव कमी होतो आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. अनेक संशोधनांमध्ये नियमित सायकलिंगमुळे आत्मविश्वास वाढतो, मन प्रसन्न राहते आणि मानसिक स्वास्थ्य सुधारते असे दिसून आले आहे. त्यामुळे सायकल ही केवळ शारीरिक आरोग्याची नव्हे तर मानसिक आरोग्याचीही प्रभावी गुरुकिल्ली आहे.

पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने सायकलचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. आज जगासमोर उभे असलेले सर्वात मोठे संकट म्हणजे हवामान बदल. औद्योगिकीकरण, वाढती वाहनसंख्या आणि जीवाश्म इंधनांचा प्रचंड वापर यामुळे वातावरणात कार्बन डायऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंचे प्रमाण वाढले आहे. परिणामी जागतिक तापमानवाढ, अनियमित पाऊस, पूर, दुष्काळ आणि विविध नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढत आहे. मोटार वाहनांमधून होणारे वायुप्रदूषण हे या समस्येचे एक प्रमुख कारण आहे. सायकल मात्र कोणतेही प्रदूषण निर्माण करत नाही. ती कार्बनमुक्त वाहतुकीचे सर्वोत्तम उदाहरण आहे. अधिकाधिक लोकांनी सायकलचा वापर केल्यास इंधनाची बचत होईल, प्रदूषण कमी होईल आणि पर्यावरणाचे संरक्षण होईल.

शहरी भागांमध्ये वाहतूक कोंडी ही गंभीर समस्या बनली आहे. मोठ्या शहरांमध्ये वाहनांची संख्या प्रचंड वाढल्यामुळे रस्त्यांवर सतत गर्दी असते. यामुळे वेळेचा अपव्यय, इंधनाचा जास्त वापर आणि प्रदूषण वाढते. अशा परिस्थितीत सायकल हा प्रभावी पर्याय ठरू शकतो. सायकलला कमी जागा लागते, ती सहजपणे चालवता येते आणि वाहतुकीवरील ताण कमी करते. जगातील अनेक विकसित देशांनी सायकलस्नेही शहरे उभारण्यावर भर दिला आहे. स्वतंत्र सायकल मार्ग, सुरक्षित पार्किंग आणि सार्वजनिक सायकल शेअरिंग यंत्रणा यांमुळे सायकलचा वापर वाढला आहे. भारतातील काही शहरांनीही या दिशेने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

सायकल आणि शाश्वत विकास यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये आरोग्य, पर्यावरण संरक्षण, गरिबी निर्मूलन, स्वच्छ ऊर्जा आणि शाश्वत शहरे यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. सायकल या सर्व उद्दिष्टांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे हातभार लावते. ती स्वस्त वाहतूक उपलब्ध करून देते, आरोग्य सुधारते, प्रदूषण कमी करते आणि ऊर्जा बचतीला प्रोत्साहन देते. त्यामुळे शाश्वत विकासाच्या दृष्टीने सायकल हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो.

भारतातील ग्रामीण भागात सायकलचे महत्त्व विशेष अधोरेखित करावे लागेल. ग्रामीण भागात अनेक गावांमध्ये सार्वजनिक वाहतुकीची सुविधा मर्यादित असते. अशा ठिकाणी सायकल हे लोकांचे दैनंदिन जीवन सुलभ करणारे साधन आहे. शेतकरी शेतात जाण्यासाठी, विद्यार्थी शाळेत जाण्यासाठी, कामगार कामाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी आणि महिला विविध घरगुती कामांसाठी सायकलचा वापर करतात. अनेक सामाजिक योजनांमधून विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात आले आहे. या योजनांमुळे मुलींच्या शिक्षणात सकारात्मक बदल झाला आहे. शाळेपर्यंतचे अंतर कमी झाल्यामुळे त्यांचे शिक्षण सुरू ठेवणे सोपे झाले आहे. त्यामुळे सायकल ही ग्रामीण विकास आणि महिला सक्षमीकरणाचे प्रभावी साधन ठरली आहे.

महिलांच्या सक्षमीकरणात सायकलची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. एकेकाळी महिलांना सायकल चालविणे हे समाजात सहज स्वीकारले जात नव्हते. परंतु कालांतराने परिस्थिती बदलली. सायकलने महिलांना स्वतंत्रपणे प्रवास करण्याची संधी दिली. शिक्षण, रोजगार आणि सामाजिक सहभागासाठी त्यांना गतिशीलता प्राप्त झाली. ग्रामीण भागातील अनेक मुलींसाठी सायकल ही शिक्षणाकडे जाणारी वाट ठरली आहे. आज अनेक महिला सायकलिंग स्पर्धांमध्ये सहभागी होत आहेत, साहसी सायकल मोहिमा राबवत आहेत आणि समाजाला प्रेरणा देत आहेत. त्यामुळे सायकल ही महिला स्वातंत्र्य आणि समानतेचेही प्रतीक बनली आहे.

क्रीडा क्षेत्रात सायकलिंगला विशेष स्थान आहे. सायकलिंग हा जगातील लोकप्रिय क्रीडाप्रकारांपैकी एक आहे. विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये हजारो खेळाडू सहभागी होतात. सायकलिंगमुळे शारीरिक क्षमता, सहनशक्ती आणि मानसिक दृढता वाढते. अनेक देशांमध्ये सायकलिंगला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष प्रशिक्षण केंद्रे आणि स्पर्धांचे आयोजन केले जाते. भारतातही सायकलिंगविषयी जागरूकता वाढत असून अनेक तरुण या क्रीडाप्रकाराकडे आकर्षित होत आहेत.

कोविड-१९ महामारीच्या काळात सायकलचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले. लॉकडाऊननंतर अनेक लोकांनी सार्वजनिक वाहतुकीऐवजी सायकलचा वापर सुरू केला. आरोग्याची काळजी घेण्यासाठी आणि सुरक्षित प्रवासासाठी सायकल हा उत्तम पर्याय असल्याचे लोकांच्या लक्षात आले. अनेक शहरांमध्ये सायकल विक्रीत मोठी वाढ झाली. महामारीनंतरही अनेकांनी सायकलिंगची सवय कायम ठेवली. यामुळे आरोग्य आणि पर्यावरण या दोन्ही क्षेत्रांमध्ये सकारात्मक परिणाम दिसून आले.

तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे सायकलच्या क्षेत्रातही अनेक नवकल्पना झाल्या आहेत. आधुनिक सायकली अधिक हलक्या, सुरक्षित आणि कार्यक्षम बनल्या आहेत. इलेक्ट्रिक सायकल किंवा ई-बाईक ही संकल्पना वेगाने लोकप्रिय होत आहे. अशा सायकलींमध्ये बॅटरीच्या सहाय्याने अतिरिक्त ऊर्जा मिळते. त्यामुळे लांब अंतराचा प्रवास अधिक सोपा होतो. तरीही पारंपरिक सायकलचे महत्त्व कमी झालेले नाही. कारण ती पूर्णपणे पर्यावरणपूरक आणि आरोग्यदायी आहे.


आजच्या तरुण पिढीसमोर सायकलचा वापर वाढविण्याचे मोठे आव्हान आहे. मोबाईल, इंटरनेट आणि आधुनिक वाहतुकीच्या साधनांमुळे शारीरिक हालचाली कमी झाल्या आहेत. त्यामुळे तरुणांनी नियमित सायकलिंगचा स्वीकार करणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि विविध सामाजिक संस्था यांनी सायकलिंगविषयी जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. सायकल रॅली, जनजागृती मोहीम आणि आरोग्यविषयक कार्यक्रम यांद्वारे सायकलचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचवता येईल.

सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिकाही या संदर्भात महत्त्वाची आहे. सुरक्षित सायकल मार्ग, सायकल पार्किंग सुविधा, सार्वजनिक सायकल भाडे योजना आणि सायकलस्नेही धोरणे यांची अंमलबजावणी केल्यास सायकलचा वापर मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. अनेक विकसित देशांनी अशा उपाययोजनांद्वारे वाहतूक आणि प्रदूषणाच्या समस्या कमी केल्या आहेत. भारतातही अशा उपक्रमांना गती देण्याची आवश्यकता आहे.

जागतिक सायकल दिन साजरा करण्यामागील उद्देश केवळ सायकलचा प्रचार करणे नाही, तर समाजाला शाश्वत आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देणे हा आहे. या दिवशी विविध देशांमध्ये सायकल रॅली, आरोग्य जनजागृती कार्यक्रम, पर्यावरण संवर्धन मोहिमा आणि शैक्षणिक उपक्रम आयोजित केले जातात. लोकांना सायकलचा अधिक वापर करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. विशेषतः तरुण पिढीला सायकलचे महत्त्व पटवून देण्यावर भर दिला जातो.

सायकल हा केवळ भूतकाळातील वाहतुकीचा वारसा नाही, तर भविष्यातील शाश्वत विकासाचा मार्ग आहे. वाढती लोकसंख्या, मर्यादित संसाधने, हवामान बदल आणि आरोग्यविषयक आव्हाने यांचा विचार करता सायकलचे महत्त्व आणखी वाढणार आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनात शक्य तितक्या प्रमाणात सायकलचा वापर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अगदी अल्प अंतरासाठीही मोटार वाहनाऐवजी सायकलचा वापर केल्यास वैयक्तिक आरोग्य सुधारेल, आर्थिक बचत होईल आणि पर्यावरणाचे संरक्षण होईल.

अखेर, जागतिक सायकल दिन आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की, प्रगती म्हणजे केवळ वेगवान आणि महागडी साधने नव्हेत, तर मानव आणि निसर्ग यांच्यातील समतोल जपणारी जीवनशैलीही आहे. सायकल हा त्या समतोलाचा सर्वात सुंदर आणि प्रभावी नमुना आहे. आरोग्यदायी शरीर, स्वच्छ पर्यावरण, आर्थिक बचत, सामाजिक समता आणि शाश्वत विकास या सर्व मूल्यांना एकत्र जोडणारे साधन म्हणून सायकलकडे पाहणे आवश्यक आहे. दोन चाकांवर चालणारी ही साधी रचना मानवजातीला अधिक निरोगी, अधिक समृद्ध आणि अधिक शाश्वत भविष्याकडे घेऊन जाण्याची क्षमता बाळगते. त्यामुळे जागतिक सायकल दिनानिमित्त आपण सर्वांनी सायकलचा अधिकाधिक वापर करण्याचा संकल्प करावा आणि आरोग्य, पर्यावरण तसेच समाजहितासाठी या साध्या पण महान साधनाचा स्वीकार करावा. सायकल ही केवळ प्रवासाची सोय नसून निरोगी जीवन, हरित पृथ्वी आणि उज्ज्वल भविष्याकडे नेणारा विश्वासार्ह जीवनमार्ग आहे.



**– डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**ईमेल** – bagate.rajendra5@gmail.com


हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध एंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सोलापुरात अवैध हातभट्टी व मद्यविक्रीविरोधात धडक कारवाई; २३.५६ लाखांचा मुद्देमाल जप्त





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : राज्य उत्पादन शुल्क विभाग, सोलापूर यांनी जिल्ह्यात अवैध हातभट्टी निर्मिती, मद्य विक्री व वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबवत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत २३ लाख ५६ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ६४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

विभागीय उपायुक्त पुणे विभाग सागर धोमकर यांच्या निर्देशानुसार तसेच अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क सोलापूर भाग्यश्री पं. जाधव, आणि उपअधीक्षक सौरभ बा. अदाटे० यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २९ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत सोलापूर शहर व जिल्ह्यात धडक कारवाई करण्यात आली.

या कारवाईत ४३ हजार १७५ लिटर रसायन, ३ हजार ७८३ लिटर हातभट्टी दारू, १६.२ बल्क लिटर देशी मद्य, १५.६ बल्क लिटर बिअर आणि १२५ बल्क लिटर ताडी असा मोठा साठा जप्त करण्यात आला. तसेच ४७ जणांवर कारवाई करून ३ वाहनांसह एकूण २३.५६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने हातभट्टी निर्मितीचे समूळ उच्चाटन करण्यावर भर दिला असून पोलीस विभाग व इतर यंत्रणांच्या समन्वयाने संयुक्त कठोर कारवाया करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. अवैध मद्य विक्री, निर्मिती किंवा वाहतुकीसाठी जागा उपलब्ध करून देणाऱ्या मालकांनाही आर-ोपी करण्यात येत असल्याची माहिती विभागाने दिली.

दरम्यान, मिथेनॉलयुक्त बनावट दारूमुळे पुण्यात घडलेल्या दुर्घटनेचा संदर्भ देत नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अशा विषारी दारूमुळे किडनी निकामी होणे, कायमस्वरूपीचा अंधत्व येणे व अकाली मृत्यू यांसारखे गंभीर परिणाम संभवतात, असे विभागाने स्पष्ट केले.

गुन्हे अन्वेषणाच्या आकडेवारीनुसार, जानेवारी ते मे २०२५ या कालावधीत सोला-पूर जिल्ह्यात १,१९७ गुन्हे, १,१०१ वारस, १,१२४ अटक आर-ोपी आणि ३ कोटी ३३ लाख २७ हजार १४९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. तर जा-नेवारी ते मे २०२६ या कालावधीत १,२९७ गुन्हे, १,२२१ वारस, १,२५४ अटक आरोपी आणि ५ कोटी ७३ लाख ३० हजार २०६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये गुन्ह्यांमध्ये ८ टक्के, वारसांमध्ये ११ टक्के, अटक आरोपींमध्ये १२ टक्के आणि मुद्देमालाच्या किमतीत ७२ टक्के वाढ झाल्याचे दिसून आले आहे. अवैध मद्यनिर्मिती, विक्री, वाहतूक किंवा मिथेनॉल, क्लोरेल हायड्रेट यांसारख्या पदार्थांच्या वापराबाबत माहिती असल्यास नागरिकांनी टोल फ्री क्रम ांक १८००२३३९९९ किंवा व्हॉट्स प क्रमांक ८४२२००११३३ वर तात्काळ माहिती द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक श्रीम ती भाग्यश्री जाधव यांनी सांगितले व अवैध मद्याबाबतची माहिती कळविण्याचे आवाहन केले आहे

## शेतकऱ्यांनी काढणीपश्चात पायाभूत सुविधा व प्रक्रिया-पॅकेजिंग युनिटसाठी अर्ज सादर करावेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : सन २०२६-२७ च्या कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी कडधान्य पिकांच्या मूल्यवर्धनास चालना देण्यात येणार आहे. योजनेअंतर्गत काढणीनंतरची पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी प्रक्रिया व पॅकेजिंग युनिट स्थापनेस आर्थिक सहाय्य देण्यात येणार असून, प्रत्यक्ष बांधकाम खर्चाच्या ३३ टक्के किंवा २५ लाख रुपये (जे कमी असेल) इतके अनुदान मिळणार आहे.

सोलापूर जिल्ह्यासाठी या योजनेअंतर्गत २ लक्षांक प्राप्त झाले असून शेतकरी उत्पादक संघ, शेतकरी उत्पादक कंपनी, प्राथमिक कृषि पतसंस्था तसेच वैयक्तिक अर्जदारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुकांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयात दि.२० जून २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

योजनेच्या अटी व आवश्यक कागदपत्रे

* बँक प्रस्ताव : अर्जदारांनी राष्ट्रीयकृत बँकेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक.
* कर्ज मंजुरी : बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतरच लाभासाठी पात्रता.
* नोंदणी व कार्यरत : संघ/पतसंस्था/कंपनी मागील दोन वर्षांपासून विधिवत नोंदणीकृत व कार्यरत असणे आवश्यक.
* ऑडिट अहवाल : मागील दोन वर्षांचे ऑडिट अहवाल सादर करणे बंधनकारक.
* जमिनीचे उतारे : वैयक्तिक अर्जदारांच्या नावावर ७/१२ व ८-अ उतारा असणे आवश्यक.
* वयाची अट : अर्जदाराचे वय किमान २१ वर्ष पूर्ण असावे.
* कुटुंबातील पात्रता : एका कुटुंबातील केवळ एका व्यक्तीस आर्थिक सहाय्य मंजूर.
* मार्जिन मनी : प्रकल्प खर्चाच्या किमान १५ टक्के रक्कम स्वतः उभारण्याची क्षमता असावी.

## शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त रायगडावर विविध कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती दुर्गराज रायगड यांच्या वतीने युवराज संभाजी छत्रपती महाराज यांच्या म ार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनानिमित्त दोन दिवसीय विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राष्ट्रवादी शरद चंद्र पवार पक्षाचे प्रदेश प्रवक्ते महादेव तळेकर यांनी दिली.

दुर्गराज रायगड किल्ल्यावर दिनांक पाच व सहा जून रोजी प्रतिवर्षीप्रम ाणे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ६ जून १६७४ साली छत्रपती शिवाजी महाराज यांना राज्याभिषेक करण्यात आला होता. या ऐतिहासिक क्षणाची स्मृती सदैव राह-ावी या हेतूने दरवर्षी दुर्गराज रायगड वर शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यामध्ये यंदा शुक्रवार पाच जून रोजी प्रथम राजमाता जिजाऊ यांच्या समाधीस अभिवादन, दुपारी चार वाजता युवराज संभाजी छत्रपती महार-ाज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे स्वागत करून हजारो शिवभक्तांच्या समवेत गड चढण्यास प्रारंभ, यानंतर गड पूजन तसेच धार तलवारीची युद्धकला म हाराष्ट्राची या युद्ध कलेच्या प्रात्यक्षिकास प्रारंभ, सायंकाळी सात वाजता ढोल वादन, लेझीम प्रात्यक्षिक व वारकरी संप्रदायाकडून टाळ मृदुंगाचा गजर, रात्री आठ वाजता जागर शिवशाहीरांचा, रात्री नऊ वाजता गडदेवता शिरकाई देवीचा गोंधळ, यानंतर वारकरी संप्रदायाकडून कीर्तन व भजन होणार आहे.

दिनांक ६ जून शिवराज्याभिषेक दिवशी सकाळी सात वाजता युवराजकुम ार शहाजीराजे यांचे हस्ते ध्वजपूजन व ध्वजारोहण, सकाळी साडेसात वाजता शाहिरी कार्यक्रम, साडेनऊ वाजता शिवछत्रपती महाराजांच्या पालखीचे राज्यसभेवर आगमन, सकाळी दहा वाजता युवराज संभाजी महाराज यांच्या हस्ते शिवछत्रपती महाराजांच्या उत्सव मूर्तीस अभिषेक तसेच राजदरबार वरील सिंहासनावरील मूर्तीस सुवर्णमुद्रांचा अभिषेक, त्यानंतर युवराज संभाजी महाराज उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. सकाळी साडेदहा वाजता सो-हळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा या कार्यक्रमास प्रारंभ तर दुपारी साडेबारा वाजता शिवछत्रपती महाराजांच्या सम ाधीस अभिवादन करून कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

सदर दोन दिवसीय कार्यक्रमास पंढरपूर शहर व तालुक्यातून हजारो शिवभक्त उपस्थित राहणार असून या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन महादेव तळेकर यांनी केले आहे.




## अधिक मास चतुर्थी निमित्त श्रीक्षेत्र पखालपूर गणपतीसाठी बसेस सोडण्यात येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : प्रत्येक चतु-र्थी दिवशी श्री क्षेत्र पकालपुर गणपतीच्या दर्शनासाठी बस सोडाव्यात या अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या मागण्यानुसार संकष्टी चतुर्थी दिवशी सोडण्यात येतात अशी माहिती पंढरपूर आगारप्रमुख योगेश लिंगायत व जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

श्री शेत्र पकालपुर येथे प्राचीन, जागृत असे गणपतीचे मंदिर आहे. नवसाला पा-वणारा गणपती अशी भाविकांची श्रद्धा आहे या ठिकाणी प्रत्येक महिन्यात चतुर्थी दिवशी दर्शनासाठी बावींसाठी मोठी गर्दी असते.

तीन वर्षातून एकदा येणारा अधिक मास चतुर्थी योग बुधवार दिनांक २/६/२०२६ रोजी असलेला आहे त्यामुळे भाविकांची मोठी गर्दी होणार आहे हे लक्षात घेऊन सकाळी सात पासून रात्रीपर्यंत श्रीक्षेत्र पकालपुर येथे जाण्या येण्यासाठी जुन्या बस स्थानकापासून बसेस सुरू करण्यात येत आहे.




तरी जाण्या येण्यासाठी ज्येष्ठ नागरिक महिला प्रवासी भाविकांनी या सेवेचा लाभ घ्यावा असे आव्हान आगर प्रमुख यो-गेश लिंगायत स्थानक प्रमुख अंकुश सरगर वाहतूक नियंत्रक मोहन शिंदे आप्पा स्टिकर ग्राहक पंचायतीचे प्रांत सहसचिव दीपक इरकल प्रांत सदस्य विनोद भरते सुभाष सरदेशमुख जिल्हा सचिव सुगरण निघते जिल्हा उपाध्यक्ष निकम उपाध्ये जिल्हा सदस्य अण्णा आहेत वाडकर पांडुरंगा कोल्हापूरकर तालुकाध्यक्ष नंदकुमार देशपांडे सचिव महेश भोसले उपाध्यक्ष प्रशांत माळवदे आझाद अल्लापुरकर कोषाध्यक्ष सागर शिंदे सदस्य योगेश देशपांडे सागर कोळेकर शशिकांत सुगंधी समाधान मिटकरी यांनी केले आहे.

## टपाल विभागाच्या निवृत्ती वेतनधारकांसाठी १२ जुनला पेन्शन अदालत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : टपाल विभागाच्या निवृत्ती वेतनधारकांसाठी व कुटुंब निवृत्ती वेतनधारकांसाठी पंढरपूर येथे पोस्टल पेन्शन अदालतीचे दि. १२ जुनला सकाळी ११.०० वाजता अधीक्षक डाकघर यांचे कार्यालय, पंढरपूर विभाग, पंढरपूर येथे आयोजन करण्यात आले आहे.

निवृत्तवेतनधारकांच्या लाभाशी संबंधीत तक्रारी, जे टपालविभागातून निवृत्त झाले आहेत व ज्यांचा सेवेत असताना मृत्यु झालेला आहे, पंढरपूर टपाल विभागामधील निवृत्तीधारकांचे तीन महिन्यांच्या आत निपटान झालेले नाही अशा प्रकरणांचा डाक पेन्शन अदालत म ध्ये विचार केला जाईल. पेन्शन अदालतम ध्ये पूर्णपणे कायदेशीर मुद्दयासह प्रकरणे, ई. वारसा प्रमाणपत्र, कल्पित पेन्शन, टीबीओपी/एमएसीपी पदोन्नती, वेतनश्रेणी वाढविणे , अशा प्रकारणांचा डाक पेन्शन अदालतमध्ये विचार केला जाईल. तसेच धोरणात्मक बाबींसह शिस्तभंगाच्या आणि डी. पी. सी. च्या पुनरवलोकनासाठी प्रलंबित प्रकरणांचा विचार केला जाण-ार नाही. निवृत्ती वेतनधारकांनी आपले अर्ज मुन्ना कुमार, अधीक्षक डाकघर, पंढरपूर विभाग ४१३३०४ येथे दि. ०५ जुन २०२६ रोजी पर्यंत पाठवावेत. नंतर मिळालेल्या अर्जावर पेन्शन अदालत मध्ये विचार करण्यात येणार नाही. अधीक्षक डाकघर, पंढरपूर विभाग, पंढरपूर यांनी कळविले आहे.

### अनावश्यक खर्चाला फाटा देत जपली सामाजिक बांधिलकी; वृद्धांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

# ज्येष्ठ पत्रकार भगवान चंदे यांचा ६० वा वाढदिवस वृद्धाश्रमात साजरा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हाध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार भगवान चंदे यांनी आपला ६० वा वाढदिवस वेगळ्या पद्धतीने साजरा करून समाजापुढे एक आदर्श ठेवला. वाढदिवसानिमित्त होणारा अनावश्यक खर्च टाळून त्यांनी भिवंडी तालुक्यातील खडवली येथील 'मातोश्री वृद्धाश्रम' येथे वृद्धांसमवेत दिवस साजरा केला.

यावेळी चंदे यांनी वृद्धाश्रम ातील आजी-आजोबांना अल्पोपाहाराचे वाटप केले व त्यांच्याशी संवाद साधत वाढदिवसाचा आनंद साजरा केला. उपस्थित वृद्धांनी औक्षण करून, टाळ्यांच्या गजरात त्यांना दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या. आज आम्हाला कुटुंबाची आठवण आली. मुलगा भेटल्यासारखे वाटले, अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या. या उपक्रमास महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा सहसचिव मिलिंद जाधव, भिवंडी तालुका अध्यक्ष मेघनाथ विशे, पत्रकार कैलास ढमणे, पंढरीनाथ पाटील तसेच भारती चंदे, प्रतीक काठोळे, गणेश कराळे व वृद्धाश्रमाचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रसंगी पत्रकार भगवान चंदे, कैलास ढमणे व लकीचंद पाटील यांनी वृद्धाश्रमाला आर्थिक मदत देऊन सामाजिक बांधिलकी जपली. केवळ सत्कार व मेजवान्यांपुरता मर्यादित न राहता दुर्लक्षित घटकांसोबत वाढदिवस साजरा करण्याच्या त्यांच्या निर्णयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. वृद्धाश्रम ातील कार्यक्रमानंतर भगवान चंदे यांनी सपत्नीक दहागाव येथील श्री स्वामी समर्थ मठात पादुकांचे दर्शन घेतले व गुरुवारी येणाऱ्या भक्तांसाठी महाप्रसादाची व्यवस्था केली. सायंकाळी पाच ते रात्री उशिरापर्यंत त्यांनी ६० शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून शैक्षणिक चळवळीला हातभार लावला. यावेळी पत्रकार संतोष गायकर, अरुण ठाकरे, अनंता घागस, संतोष चोणकर, पांडुरंग गायकवाड, प्रवीण काठोळे, प्रतिभा काठोळे, भगवान बोंद्रे, शांताराम भोईर, दीपक चंदे, दीप्ती चंदे यांच्यासह अनेक ग्रामपंचायत अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उप-स्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिषेक चंदे, नलिनी वेखंडे, सुभाष सातप-ुते, पारू सातपुते आदींनी विशेष परिश्रम घेतले.

**वाढदिवस म्हणजे केवळ स्वतःपुरता आनंद नाही. समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो. या भावनेतून ९० माय-बापांसोबत काही क्षण घालवले. त्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान हेच म ाझ्यासाठी खरे गिफ्ट आहे,**

**जेष्ठ पत्रकार – भगवान चंदे**

# पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टींनी सूत्र फिरवली अन् सोलापूरात काँग्रेसचा गेम, हे सात उमेदवार रिंगणात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर विधान परिषद निवडणुकीच्या नामनिर्देशन पत्र छाननी दरम्यान राजकीय घडामोडी पाहायला मिळाल्या. पंढरपूरचे नगरसेवक नागेश भोसले हे काँग्रेस पक्षाचे उमेदवाराला सुचक होते परंतु त्यांनीच या उमेदवारावर हरकत घेत सूचक म्हणून आपली सही नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केल्याने काँग्रेसचा या निवडणुकीत गेम झाला.

जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या साठी ही विधान परिषदेची निवडणूक प्रतिष्ठेची आहे भारतीय जनता पार्टी कडून माजी आमदार राजेंद्र राऊत यांना उमेदवारी मिळाल्यानंतर पालकमंत्री गोरे आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी या निवडणुकीसाठी शिस्तबद्ध नियोजन केल्याचे पाहायला मिळत आहे.



संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागले होते ते या निवडणुकीच्या नाम निर्देशन पत्राच्या छाननीकडे. प्रथमच विधान परिषदेची जागा काँग्रेसला सुटल्याने पंढरपूरचे माजी नगरसेवक आदित्य फत्तेपूरकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला होता. या निवडणुकीसाठी सूचक म्हणून मतदारांपैकी दहा सदस्य यांची सही लागते. दरम्यान फत्तेपुरकर यांच्या अर्जावर सूचक म्हणून सही केलेले पंढरपूरचे नगरसेवक नागेश भोसले यांनीच फत्तेपुरकर यांच्या अर्जावर हरकत घेत यातील सही माझी नाही असे म्हणून त्यांनी आपले प्रतिज्ञापत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दिले आहे.

सकाळी अकराच्या दरम्यान नागेश भोसले हे भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे असे कार्यकर्त्यांसह जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले.

माहिती घेतली असता समजले की, पालकमंत्री जयकुमार गोरे हे सकाळी ११ वाजता सोलापुरात दाखल झाले होते. त्यांनी हॉटेल बालाजी सरोवर मध्ये बसून सकाळची सूत्र हलवली. जिल्हाधिकारी कार्यालयात आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार देवेंद्र कोठे हे उमेदवार राजेंद्र राऊत यांच्यासह ठाण मांडून होते. दुपार नंतर पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार राम सातपुते, माजी आमदार दिलीप माने ही नेतेमंडळी शहाजी भाऊ पवार यांच्या यमाई कंट्रक्शन मध्ये बसून या निवडणूक प्रक्रियेच्या हालचालींवर लक्ष ठेवले.

खासदार प्रणिती शिंदे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात येऊन निवडणूक निर्णय अधिकारी कार्तिकेयन यांची भेट घेतल्याचे दिसून आले. दुपारी दीड वाजल्यापासून काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे उमेदवार फत्तेपूरकर हे रात्रीच्या आठ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात ठिय्या मांडून होते.

रात्री आठच्या दरम्यान निवडणूक निर्णय अधिकारी कार्तिकेएन यांनी आपला निकाल दिला. या निकालात रमेश बारस्कर यांनी राजेंद्र राऊत यांच्या अर्जावर घेतलेल्या चारही हरकती फेटाळण्यात आल्या. काँग्रेस उमेदवार आदित्य फत्तेपूरकर यांच्या अर्जावर नागेश भोसले यांनी घेतलेली हरकत मान्य करून जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी फत्तेपुरकर यांचा अर्ज रद्द ठरवला आहे. त्याचबरोबर न्यू राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार वाघमोडे यांचाही अर्ज बाद करण्यात आला आहे.

आता या निवडणुकीत हे उमेदवार रिंगणात

श्री वसंतराव दौलतराव देशमुख ( शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पार्टी)

राजेंद्र विठ्ठल राऊत (भारतीय जनता पार्टी )

अक्कलकोट नागेश हरिभाऊ बाबराव (अपक्ष)

जीवन उत्तमराव जानकर (अपक्ष)

धनंजय महादेव डिकळे (अपक्ष)

महेश देविदास साठे (अपक्ष)

रमेश नागनाथ बारस्कर (अपक्ष)

हे उमेदवार रिंगणात आहेत.

आता राहिलेल्या दोन दिवसात कोण कोण माघार घेणार आणि भारतीय जनता पार्टी ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न करणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सिन्नर तालुका भाजपाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये सिन्नर तालुक्यातील मुला-मुलींनी, विशेषतः विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन करून तालुक्याचा नावलौकिक वाढवला असून. या गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करण्यासाठी आणि त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देण्यासाठी सिन्नर तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न झाला.

सिन्नर शहरातील चांडक कन्या विद्यालय येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत हा सोहळा पार पटला. तालुक्यातील जवळपास ८० ते ९० माध्यमिक शाळा आणि



उच्च माध्यमिक महाविद्यालयांमधील दहावी व बारावीच्या परीक्षेत पहिले तीन क्रमांक पटकावणाऱ्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी यथोचित सत्कार करण्यात आला.

या सोहळ्याप्रसंगी नाशिक जिल्हा भाजपचे अध्यक्ष सुनील बच्छाव, सिन्नर तालुका भाजपचे अध्यक्ष जयंत बाबू आव्हाड, भारत सेठ कोकाटे, सिन्नरचे युवा नेते उदय भाऊ सांगळे, महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव एस. बी. देशमुख सर, भाजपचे भाऊसाहेब शिंदे, नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष व सिन्नर तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष एल. डी. बेनके , सिन्नर तालुका मुख्याध्यापक संघ सचिव एम. डी. काळे, सुनील हांडे आणि ज्ञानदेव । चिने यांच्यासह भाजपचे असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**१० वी आणि १२ वीच्या पहिल्या तीन विद्यार्थ्यांचा गौरव**

विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश हे त्यांच्या कष्टाचे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे फलित आहे. या उत्कृष्ट मार्क मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देणे हे आपले कर्तव्य आहे, याच भावनेतून सिन्नर तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, अशा भावना यावेळी भाजपा पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केल्या.आपल्या पाल्यांचा आणि विद्यार्थ्यांचा भाजप परिवाराच्या वतीने झालेला हा यथोचित गौरव पाहून उपस्थित पालक आणि शिक्षकांनीही समाधान व्यक्त केले.

# ग्रामपंचायत जवळे दु येथे ग्रामनिधीच्या खर्चात अनियमितता - चौकशी करुन ग्रामपंचायत अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाईची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : ग्रामपंचायत मौजे जवळे दु.ता.जि.धाराशिव येथील ग्राम पंचायतीच्या स्वउत्पन्नातून १५% मागासवर्गीय,१०% महिला व बालकल्याण आणि ५% प्रमाणे अपंगासाठी करावयाच्या खर्चामध्ये ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी सन-२०१९-२० ते सन २०२३-२४ या कालावधीत अनियमितता केली असून याप्रकरणी तात्काळ चौकशी करून तत्कालीन ग्रामपंचायत अधिकाऱ्याविरुद्ध प्रशासकीय कारवाई करणेबाबत श्री प्रकाश गणपती सोनार यांनी जिल्हाधिकारी धाराशिव यांचेकडे दि. १जून २०२६ रोजी निवेदन




दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की सदर विषयाच्या अनुषंगाने मा उपमुख्य कार्यकारी अधिकारी जि प धाराशिव यांनी दि. १७/४/२०२६रोजी गटविकास अधिकारी पंचायत समिती धाराशिव यांना पत्र देऊन शासन नियमानुसार नियमोचित कार्यवाही करावी तसेच स्वयंस्पष्ट अभिप्रायासह संबंधितास परस्पर कळविण्यात यावा विलंबाची जबाबदारी आपणावर राहील याची नोंद घ्यावी अशा प्रकारचे आदेश जारी केले आहेत, त्यानुसार गटविकास अधिकारी यांनी विस्तार अधिकारी श्री ढाकणे एस एस यांना दि.२४/१०/२०२५ व २८/०४/२०२६ रोजी दोन पत्रे देऊन विषयांकित प्रकरणी मुदतीत चौकशी करून स्वयंस्पष्ट अभिप्रायसह अहवाल सादर करावा विलंबाची जबाबदारी आपणावर राहील याची नोंद घ्यावी अशा प्रकारे आदेश जारी केले आहेत. तसेच सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय जवळे दु यांना चौकशीकामी चौकशी अधिकारी यांना आवश्यक ते अभिलेखे मागणीप्रमाणे उपलब्ध करून देण्यासंबंधी सूचना दिल्या आहेत. परंतु विस्तार अधिकाऱ्यांनी सात महिने होऊन गेले तरीही गट विकास अधिकारी यांच्या आदेशास न जुमानता आजपावेतो सदर प्रकरणी चौकशी केलेली नसून चौकशी अहवाल सादर केलेला नाही यावरून विस्तार अधिकारी हे चौकशी कामी जाणीवपूर्वक हयगय करत आहेत असे तक्रारीत म्हटले आहे. त्यामुळे पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्याकडून योग्य ती दखल न घेतल्यामुळे श्री प्रकाश सोनार यांनी जिल्हाधिकारी धाराशिव यांना तक्रार करुन विस्तार अधिकारी श्री ढाकणे एस एस यांचे जागी अन्य कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची चौकशीकामी नियुक्ती करून सदर प्रकरणाची चौकशी करावी व दोषी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांविरुद्ध नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

# अहिल्यादेवी होळकर यांनी राज्य कारभार स्विकारला नितीमान व उत्कृष्ट न्यायप्रियक शासक होत्या : ॲड. अरविंद बेडगे



**नळदुर्ग येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : अहिल्यादेवी होळकर या भारताच्या इतिहासातील एक थोर स्त्री शासक स्त्रि होत्या ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील चांदी गावात त्यांचा जन्म झाला अहिल्यादेवी होळकर ह्या लहान पणा पासूनच बुद्धिमान धर्मप्रेमी होत्या त्यांचे लग्न मल्हारराव होळकर यांच्या मुलाशी म्हणजे खंडेराव होळकर यांच्याशी झाले खंडेराव होळकर यांच्या निधनानंतर अहिल्यादेवी होळकरांनी राज्यकारभार स्वीकारला आणि एक योग्य नीतिमान आणि न्यायप्रिय शासक म्हणून अहिल्यादेवी होळकर या प्रसिद्ध झाल्या अहिल्यादेवी होळकरांनी राज्यात अनेक मंदिर घाट धर्मशाळा आणि विहिरी बांधल्या वाराणसी गंगा घाट सोमनाथ रामेश्वर यासारख्या अनेक पवित्र ठिकाणी कामे केली प्रजेच्या कल्याणासाठी किंवा सुखात आणि दुःखात सहभागी व्हायाच्या आशा थोर समाज सुधारक राजमाता आहिल्यादेवी होळकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक घरामध्ये अहिल्यादेवी होळकरांचे कार्य पोहोचविणेआजच्या काळाची गरज आहे असे प्रतिपादन नळदुर्ग येथील सामाजिक कार्यकर्ते तथा ॲड अरविंद बेडगे हे नळदुर्ग येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नळदुर्ग नगरीचे विद्यमान नगराध्यक्ष बसवराज आप्पा धरणे हे होतेकार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर घोडके यांनी केले तर कार्यक्रमचे प्रमुख पाहुणे म्हणून नळदुर्ग नगर परिषदेचे बांधकाम सभापती तानाजी जाधव, नळदुर्ग नगरीचे नगरसेवक तथा गटनेते मारुती खारवे, दत्तात्रय दासकर, नगरसेवक सुधीर पोतदार, माजी नगरसेवक विनायक अहंकारी , सुधीर भैया हजारे , नळदुर्ग शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे ज्येष्ठ पत्रकार विलास येडगे, पत्रकार उत्तम बनजगोळे, पत्रकार दादासाहेब बनसोडे, सामाजिक कार्यकर्ते संजय जाधव, पत्रकार मित्र अमर भाळे, शिवाजी सुरवसे, मनसेचे नेते ज्योतिबा येडगे, मारुती घोडके, भाजीपाचे नेते पद्माकर घोडके, सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर घोडके, सामाजिक कार्यकर्ते मुकुंद नाईक, सेवानिवृत्त शिक्षक सुनील ऊखंडे, चौरे, नळदुर्ग बस स्थानकाचे वाहतूक नियंत्रण महेश डुकरे, सोसायटीचे संचालक रघुनाथ, आप्पा नागणे, भीमाशंकर बताले आधी जर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार ज्ञानेश्वर घोडके यांनी मानले

**राजमाता अहिल्यादेवी होळकर या देशातल्या क्रांतिकारक महिला आसून यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवण्यासाठी त्यांची प्रेरणा नागरिकांना मिळण्यासाठी आपल्याला अहिल्यादेवी होळकर सभा मंडपाचे काम तात्काळ करण्याचे आश्वासन नळदुर्ग नगरीचे नगराध्यक्ष बसवराज आप्पा धरणे यांनी दिले .राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती निमित्ताने अध्यक्षीय समारोपा प्रसंगी ते बोलत होते.**

**पथकाची सतर्कता; अल्पवयीन मुलींना मिळाले पुन्हा जीवनदान**

# निर्भया पथकाला बालविवाह रोखण्यात यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : दि. ०२ रोजी निर्भया पथकाला मिळालेल्या माहितीप्रमाणे पंढरपूर ग्रामीण हद्दीत एक बालविवाह आज रोजी १० वाजता होणार होता.

मात्र पोलिसांनी नवरदेवाचे मोबाईल लोकेशन वरुन सदर ठिकाणचा तात्काळ शोध लावून बालविवाह रोखला आहे.

निर्भया पथकाने चौकशी केली असता मुलीचे नातेवाईकांनी आधारकार्ड दाखवताच मुलीचे वय हे १७ वर्षे ५ महिने असल्याचे निष्पन्न झाले, मात्र पोलीस पथकाने जास्तीची चौकशी करत तीचा शाळा सोडल्याचा दाखला मिळवला. त्यावर देखील तिचे वय हे १७ वर्षे ०५ महीने दिसुन आले. त्यानंतर मंडपातील मंडळींना व वडीलांना योग्य ती समज देवुन सदर बालविवाह रोखण्यात आलेला आहे.

त्या अल्पवयीन मुलीस बालकल्याण समिती, सोलापूर यांचेसमक्ष पुढील कार्यवाहीकरीता हजर करण्यात आले.

तसेच निर्भया पथक, पंढरपूर विभाग, पंढरपूर यांनी पंढरपूर शहर, पंढरपूर तालुका, पंढरपूर ग्रामीण तसेच करकंब पोलीस ठाणे हद्दीतील सर्व जनतेला आवाहन केले आहे की, अशा घटना या वारंवार होत असुन अल्पवयीन मुलींचे जीवन हे खुलण्याआधीच तिच्यावर जबाबदारींचे ओझे वाहणे बंद करावे व आपले हद्दीमध्ये, आपल्या नातेवाईकांमध्ये अशा प्रकारचे बालविवाह होत असल्यास निर्भया पथकास संपर्क करावा. असे आवाहन केले आहे

सदरची कारवाई मा. अतुल कुलकर्णी, पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण, मा. विजय कबाडे, अप्पर पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण, मा. प्रशांत डगळे, सहा. पोलीस अधिक्षक (भा.पो. से) पंढरपूर विभाग, पंढरपूर यांचे मार्गदर्शनाखाली निर्भया पथक प्रमुख म. पोलीस उपनिरीक्षक / सुप्रिया यादव/रावण, म.पोकॉ/१३११ निर्मला वाघमारे, म. पोकॉ/२०४८ शाहिन, पोकॉ/१२३६ शशिकांत सावंत, पोकॉ/१३९५ लक्ष्मण कुचेकर, चापोकॉ/७२ पांडुरंग टिंगरे, काझी यांनी पार पाडलेली आहे.

# स्वेरीतर्फे 'मातोश्री' वृद्धाश्रमात फळे वाटप!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी तथा 'श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट' या शिक्षणसंस्थेचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे (सर) यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, गोपाळपूर येथील 'मातोश्री वृद्धाश्रम' येथे वृद्धांना फळे वाटप करण्यात आली. वाढदिवसाचा कोणताही बडेजाव न करता, केवळ सामाजिक कर्तव्याची जाणीव ठेवून राबविण्यात आलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

डॉ. बी. पी. रोंगे (सर) यांनी ग्रामीण भागातील उच्चशिक्षणाचा दर्जा उंचावण्यात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबवण्याची 'स्वेरी'ची परंपरा आहे. याच परंपरेचे पालन करत यावर्षी मातोश्री वृद्धाश्रमाचे अध्यक्ष ह.भ.प. बद्रीनाथ महाराज तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या





या वृद्धाश्रमातील आजी-आजोबांची भेट घेऊन त्यांच्याशी आपुलकीचा संवाद साधण्यात आला व त्यांना फळे वाटप करण्यात आली. याप्रसंगी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांनी डॉ. रोंगे सर यांना सुदृढ आरोग्य आणि दीर्घायुष्यासाठी मनःपूर्वक आशीर्वाद दिले.

**प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे (सर) यांच्या वाढदिवसानिमित्त 'स्वेरी' परिवाराचा उपक्रम**

या उपक्रमाप्रसंगी 'स्वेरी संचलित कॉलेज ऑफ फार्मसीचे डॉ. वृणाल मोरे, डॉ. प्राजक्ता खुळे, 'लोटस इंग्लिश स्कूल'च्या प्राचार्या डॉ. जयश्री भोसले, सहशिक्षक सचिन निकम, संपत लवटे, दयानंद जाधव, शिक्षकेतर कर्मचारी संजय फुले यांच्यासह वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक धनंजय राक्षे आणि सेवकवर्ग उपस्थित होते. वाढदिवसाच्या निमित्ताने लाखो रुपये खर्चून बॅनरबाजी, फटाके याला फाटा देऊन फळे वाटप करून सामाजिक उपक्रम करणाऱ्या स्वेरीचे या निमित्ताने सर्वत्र कौतुक होत आहे.

'स्वेरी' परिवाराने जपलेल्या या सामाजिक बांधिलकीचे आणि उपक्रमाचे पंढरपूर शहर आणि पंचक्रोशीत कौतुक केले जात आहे.